ISSN: 2347-2723 IMPACT FACTOR : 3.3754(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 2 | SEPTEMBER - 2017

REVIEW OF LITERATURE

# नक्षलवादी चळवळीचे बदलते संदर्भ

डॉ. उल्का देशमुख
श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालय, लातूर.

### प्रस्तावना :



भारताची राष्ट्रीय एकात्मता व अखंडतेसमोर नक्षलवाद हा एक प्रमुख अडथळा बनला आहे. त्यामुळे नक्षलवाद हे भारतीय शासनापुढे आव्हान ठरले आहे. यासंदर्भात भारताचे पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी आपल्या भाषणात, ''भारताच्या अंतर्गत सुरक्षेला आव्हान देणाऱ्या अनेक प्रश्नांपैकी नक्षलवाद हा ज्वलंत प्रश्न आहे,'' असे म्हटले आहे. गेल्या 46.47 वर्षात नक्षलवादी कारवायांची बरीच वाढ झालेली आहे. नक्षलवादाचा उगम कसा झाला? त्याच्या उगमाचे मूळ कोठे आहे? त्याचे समाजावर काय परिणाम होतात? नक्षलवादाचे बदलते स्वरूप काय आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे. अनेक समस्यांपैकी 'नक्षलवाद' ही एक समस्या आहे. ही समस्या प. बंगालमध्ये सुरू झाली आणि आज सर्वत्र या समस्येची चर्चा झालेली दिसून येते; कारण नक्षलवाद्यांच्या संदर्भातील घटना–घडामोडींचे प्रतिबिंब प्रसारमाध्यमातून अधिक ठळकपणे उमटू लागले आणि मध्यमवर्गाचे, उच्चशिक्षितांचे व सर्व क्षेत्रांतील बुद्धिवादी लोकांचे लक्ष या प्रश्नांकडे वेधले गेले.

### उद्दिष्टे :

1.नक्षलवादी चळवळीच्या उगमाचा अभ्यास करणे.
2.नक्षलवादी चळवळीच्या परिणामांचा आढावा घेणे.
3.नक्षलवादी चळवळीच्या परिवर्तनशीलतेचे परीक्षण करणे.

### गृहीतकृत्ये :

1. नक्षलवादाच्या उगमासाठी अनेक कारणे जबाबदार आहेत.
2. नक्षलवादी चळवळीमुळे समाजात भीतीचे वातावरण तयार होते.
3. नक्षलवादी चळवळ आधुनिक शस्त्रांचा वापर करतात.
4. नक्षलवादी चळवळीने मूळची दिशाच सोडली आहे.

### तथ्यसंकलन :

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये द्वितीयक स्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे.

### संकल्पनात्मक मांडणी :

1. विनोद मिश्रा– ''नक्षलवादी चळवळ ही प्रत्येक अत्याचाराच्या विरोधात, विद्रोहाचे प्रतीक आहे. त्यामुळे विद्रोहाच्या सर्वच विचारधारा यामध्ये समाविष्ट आहेत.''
2. सुहास पळशीकर– ''जनतेच्या कष्टकरी व शोषित वर्गाच्या संघटित जहालवादी कृतीद्वारे प्रस्थापित ताकदीला आव्हान देण्याचा मार्ग म्हणजे नक्षलवादी चळवळ होय.''

### विश्लेषण :

1967 मध्ये पश्चिम बंगालमध्ये एक स्वयंस्फूर्त किसान आंदोलन झाले. स्वातंत्र्यपूर्व काळातही बंगालमध्ये कुळाचे अधिकार आणि संरक्षण मिळवून देण्यासाठी सन 1946–47 मध्ये 'तेभागा' आंदोलन झाले होते. कम्युनिस्ट चळवळीच्या नेतृत्त्वाखाली सुरू झालेल्या या आंदोलनाने उग्र रूप धारण केले होते; परंतु स्वातंत्र्यप्राप्ती आणि त्यासोबत आलेल्या विभाजनातून बंगालमध्ये जातीय दंगली आणि राजकारण उसळले. त्यानंतरच्या राजकीय घडामोडी आणि पक्षीय राजकारणात विकासाचे अग्रक्रम बदलले आणि बटाईदारांचा दशकानुदशके प्रलंबित असलेला प्रश्न राज्यकर्त्यांच्या दृष्टिआड झाला. परिणामी नक्षलवादी चळवळ सुरू होण्यात झाला.

नक्षलवादी आंदोलनाची वैशिष्ट्यो म्हणजे ते आंदोलन सकृतदर्शनी स्थानिक स्वरूपाचे आहे. दुसरे या आंदोलनाने उघडपणे हिंसाचाराचा वापर करण्यास प्रतिष्ठा दिली; परंतु आता यात खालील बदल झाले आहेत.

1. या उग्र आंदोलनाचे स्वरूप आता स्थानिक राहिलेले नाही. नक्षलवादी चळवळ ही देशाच्या वेगवेगळ्याा भागातही पसरली. तरीपण त्या—त्या प्रदेशात चळवळीचा प्रभाव स्थानिक पातळीवरच मर्यादित होता.
2. बटाईदारांच्या प्रश्नांतून निर्माण झालेले हे आंदोलन त्या प्रश्नातून बाहेर आले आणि सर्वच शोषित वर्गाचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यापर्यंत त्याच्या कार्यक्षेत्राचे क्षितीज विस्तृत होत गेले.
3. शोषित वर्गाच्या प्रश्नांवर त्यांच्या सामाजिक संदर्भामध्ये नक्षलवादी चळवळीने प्रवेश केला व ही चळवळ केवळ बंगालपुरती मर्यादित न राहता इतर राज्यांतही पसरली. बिहार, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, ओरिसा, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, पंजाब वगैरे.

नक्षलवादी चळवळ सुरू होण्यासाठी एक घटना कारणीभूत ठरली, ती म्हणजे नक्षलवादी हे गाव पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्याात असून चारू मुजूमदार यांचे हे गाव होय. या गावाजवळच बडा माणिराम जोत नावाचे गाव आहे. या गावाहून काही तरुणांनी तांदूळ लुटून तो शेजारील नेपाळ देशात विकला. येथून नक्षलबंडाळीची सुरुवात झाली तसेच या गावचा जमीनदार नागराय चौधरी वृद्ध व नावापुरताच जमीनदार होता, तरी त्यांची पहिली आहुती या लढ्याात पडल्याने नागरायची हत्या नक्षलवादीत झाली, अशी वार्ता पसरली. यामुळेच बंडाली करणाऱ्या या पक्षाच्या लोकांना 'नक्षलवादी' ही उपाधी कायमची चिकटली आणि त्यांच्या हिंसाचाराला 'वाद' असा तात्त्विक अर्थ त्यांनीच लावला.

जमीनदारी पद्धतीद्वारे शेतकऱ्यांवर जास्तीचा कर लावून आर्थिक शोषण केले गेले. प. बंगालमध्ये सावकार, भांडवलदार यांच्याकडून श्रमिक घटकांचे मोठ्याा प्रमाणात आर्थिक शोषण झाले. विशेषतः जमीनदारांनी शेतकऱ्यांच्या जमिनी हडप केल्या, असंतोषाची भावना श्रमिकवर्गात बळावली. यातूनच नक्षलवादी चळवळ निर्माण झाली. याबरोबर या चळवळीच्या उदयासाठी काही कारणेही जबाबदार आहेत.
1. जमिनीची मालकी न मिळणे.
2. प्रशासनातील लालफितशाही व भ्रष्टाचार.
3. अधिकाऱ्यांकडून मिळणारी वागणूक.
4. आदिवासींचे होणारे आर्थिक शोषण.
5. भ्रष्टाचार.
6. शेतकऱ्यांचे आर्थिक व सामाजिक शोषण.
7. सामाजिक विषमता व असंतोष.
8. साम्यवादी विचारांचा प्रभाव.
9. बेकारी, दारिद्र्या.

या कारणांमुळे नक्षलवादाचा उगम झाल्याचे दिसून येते. नक्षलवादाची हिंसाचारातून क्रांती घडविण्याच्या संकल्पनेवर निष्ठा आहे. देशाच्या अनेक भागात नक्षलवादी कार्यकर्ते न्यायव्यवस्था चालवत असलेले दिसतात. त्यामुळेच नक्षलवादाचा प्रसार व प्रचार 22 राज्यांत 232 जिल्ह्यांत झालेला दिसून येते. चारु मुजूमदार, कानु संथाल, विनोद मिश्रा यांनी सुरू केलेल्या चळवळीला एक विचारधारा होती. शोषणाच्या विरुद्ध लढण्यासाठी ही चळवळ सुरू होती; पण या चळवळीने आपले स्वरूप बदलून दहशतीचे वातावरण निर्माण केले. त्यामुळे या चळवळीचे भारतीय समाज व शासनव्यवस्थेवर विपरित परिणाम झालेले दिसून येतात.
1. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. कायदा स्वतः हाती घेऊन त्यांच्या कार्यकर्त्यांना नक्षलवाद्यांनी स्वतःच शिक्षण देण्यास सुरुवात केली.
2. आर्थिक मागणीसाठी शेतकरीवर्गाने उद्रेक केला.
3. नक्षलवादामुळे देशाच्या अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला.
4. शासकीय अधिकारी, पोलीस कर्मचारी हे नक्षली भागात नोकरी करण्यास मानसिकदृष्ट्याा तयार होत नाहीत. त्यामुळे या भागात सुरक्षाव्यवस्था कमी पडत आहे व नक्षलवादी आतंक वाढत जात आहे.
5. आदिवासींची पिळवणूक होत आहे.
6. अपहरण, हिंसा, खून, दरोडे, लूटमार, हत्या यांसारख्या हिंसात्मक मार्गांमुळे समाजात असुरक्षितता निर्माण करून मानवी मूल्ये पायदळी तुडविली जात आहेत.
7. राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण होत आहे.
8. शांतता व सुव्यवस्था धोक्यात येत आहे.
9. नक्षलवाद्यांच्या कारवायांमुळे सार्वजनिक मालमत्तेला नुकसान पोहचविले जाते. त्याचबरोबर वर्तमानकाळात फार मोठ्याा प्रमाणात जीवितहानी होत आहे. त्यामुळे निरपराध लोकांचा बळी जात आहे.

भारतीय समाजामध्ये आदिवासींच्या जीवनात दारिद्र्या, उपासमार तर आहेच; पण त्याचबरोबर सावकारांकडून त्यांचे शोषणही होते. त्यामुळे त्यांचा अपमान होतो. म्हणून त्यांनी नक्षलवादाला जवळ केले; पण परिस्थिती मात्र वेगळी घडली. त्याचे परिणाम विपरित झाले आणि नक्षलवादी चळवळीने आपले स्वरूप बदलले.

### *नक्षलवादी चळवळीचे बदलते संदर्भ :*

नक्षलवादी चळवळीची जेव्हा सुरुवात झाली, त्यापाठीमागे उदात्त हेतू होता. अन्यायग्रस्त अशा आदिवासी उपेक्षित जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी ही चळवळ सुरू झाली. सशस्त्र क्रांतीद्वारेच परिवर्तन शक्य आहे. या गृहीतकावर नक्षलवादी चळवळ आधारलेली आहे. संपूर्ण क्रांती, अत्याचारग्रस्त जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणे हे नक्षलवादी चळवळीचे ध्येय होते आणि हे ध्येय साध्य करताना काही प्रमाणात हिंसा ही क्षम्य आहे. हिंसेचे कदापिही समर्थन केले जाऊ शकत नाही; परंतु हे उदात्त ध्येय साध्य करत असताना कळत—नकळत जर त्यांच्याकडून हिंसा होत असेल, तर अशा हिंसेकडे दुर्लक्ष केले गेले; परंतु सद्यपरिस्थितीत हिंसाचाराच्या घटना पाहता साधन हेच साध्य झाले आहे की काय, अशी शंका आल्यावाचून राहत नाही. ज्या उदात्त हेतूंनी चारु मुजूमदार आणि कनु संन्याल यांनी नक्षलवादी चळवळ उभी केली होती, त्या हेतूपासून ही चळवळ भरकटत आहे. त्यामध्ये परिवर्तन होत आहे.

सत्ता ही बंदुकीच्या नळीतून जन्म घेते, या युक्तीप्रमाणे नक्षलवादी चळवळ आज बंदुकीच्या नळीमध्ये बंद झाली आहे. तिने आपली विचारसरणी बदलली आहे. म्हणजेच ही चळवळ दहशतवादी बनली आहे. आंदोलनापेक्षा हिंसा, शोषण, राष्ट्रीय मालमत्तेचे नुकसान यावर अधिक भर दिला जात आहे. नक्षलवादी चळवळीने आपली खरी व मूळची दिशा सोडली आहे. चारु मुजूमदारानंतर आलेल्या पुढाऱ्यांनी तिचे उद्दिष्ट बदलले आणि तिला निव्वळ दहशतवादी बनवले. गरिबांसाठी उभी झालेली चळवळ त्यांच्या गळ्याावर वार करताना दिसू लागली.

सुरुवातीला चळवळ वाढवण्यासाठी पारंपरिक तीर—कामठ्यासारख्या शस्त्रांचा वापर करण्यात आला; पण आज तीर—कामठ्यांची जागा

एके–47 ने घेतली. यातून असंख्य लोकांचा जीव घेतला गेला. बंदची हाक देणारी चळवळ आता अपहरणाच्या माध्यमातून सौदेबाजी करायला लागला. म्हणजेच आजची चळवळ ही नक्षलवादी राहिली नाही.

या चळवळीचे भयावह स्वरूप म्हणजे रक्तरंजित पर्वाकडे झालेले आहे. आतापर्यंत नक्षलवादी चळवळ केवळ आदिवासी व जंगलातील लोक व ग्रामीण भागातील लोकांपुरती मर्यादित होती; पण आता ती जागतिक स्वरूपाची झाली आहे. समाजाच्या सर्वच क्षेत्रांत वावरणारे बुद्धिवादी यांनीही एकत्र आणून, एकीकडे हिंसाचार आणि एकीकडे बुद्धिवाद्यांकडून सरकारवर दबाव टाकून सातत्याने चर्चेत राहावयाचे सूत्र ही या चळवळीने जोपासायला सुरुवात केली आहे.

आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी वेगवेगळ्याा मार्गांचा अवलंब करत असल्याचे दिसून येत आहे. त्यामध्ये ओरिसामधील मलकानगरीचे जिल्हाधिकारी आर. व्ही. कृष्णा आणि छत्तीसगड राज्यातील सुकमा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी ॲलेक्स पॉल मेनन यांचे अपहरण यामुळे नक्षलवादी चळवळीचे नवे रूप समोर आले आहे. म्हणजेच आजची चळवळ पूर्वीच्या उद्देशांपासून भटकत जात आहे. म्हणजेच आतंकवादाच्या मार्गाने जात आहे. हिंसेच्या मार्गाने जाणाऱ्या चळवळीतून भटकण्याशिवाय काहीच मिळत नाही. आजच्या नक्षलवादी चळवळीत अनेक गट, जाती पडलेल्या दिसून येतात. आज नक्षलवादी चळवळीतून संपत्तीची हानी, मनुष्यहत्या झालेल्या दिसतात. वर्गसंघर्ष आंदोलनाऐवजी क्रौर्य, हिंसेचा वापर केला जात आहे. आर्थिक विकास हे आंदोलनाचे निमित्त होते; पण आज तेथे विकास झाला तर संघटनेला सुरुंग लागेल. त्यामुळे नक्षलवादाचा राग सरकार व पोलीस यांच्यावर आहे. म्हणून नक्षलवादी पोलीस, सरकार यांच्या विरोधात कार्य करीत आहेत आणि समाजावर त्याचा वाईट परिणाम होत आहे.

यासाठी आपली सामाजिक स्थिती याला कारणीभूत आहे. अन्याय एका बाजूला तर दुसऱ्या बाजूला प्रतिकारही आपोआप उभा राहतो, हे सार्वकालिक सत्य आहे. बिहारमधील जातीयता, आंध्र, पश्चिम बंगालमधील जमीनवाटपाचा प्रश्न आणि महाराष्ट्रातील आदिवासी भागातील शोषण यात कधी कुठल्याही शासनाने गांभीर्याने लक्ष घातले नाही. परिणामी, बिहारमध्ये जमीनदाराची सेना जेव्हा एखाद्या वस्तीला घेरून 30–40 माणसे मारते, तेव्हा महिनाभराच्या आत दोन–चार जमीनदार मारून त्यांचा बदला घेणारे नक्षलवादी तेथील अन्यायग्रस्तांना आपले वाटतात. आणि जोपर्यंत भूमिहीन मजूर, आदिवासी यांना ते 'आपले' वाटतात, तोपर्यंत 'नक्षलवाद' संपणे अशक्य आहे.

### *निष्कर्ष :*

1. नक्षलवादी चळवळीमुळे देशाची अंतर्गत सुरक्षा धोक्यात आली आहे.
2. आज नक्षलवादी चळवळीचा मुख्य आधार हिंसा, दहशत, अपहरण बनला आहे.

### *संदर्भ सूची :*

1. नक्षलवादी एक राष्ट्रीय संकट— सुरेश द्वादशीवार.
2. भारतीय समाज प्रश्न आणि समस्या— डॉ. बी. एम. कऱ्हाडे.
3. भारतातील सा. चळवळीची रूपरेषा— प्रा. सी. टी. कांबळे, टी. एस. पवळे
4. नक्षलवादी आणि आदिवासी— डॉ. गोविंद गारे
5. नक्षलवाद कारण समस्या एवं समाधान— मनोज श्रीवास्तव.
6. वर्तिका— माओवादी या आदिवासी— संपादकः महाश्वेता देवी, अरुण कुमार त्रिपाठी.
7. नक्षलवादाचा प्रवास— प्रकाश कोळवणकर.